अयोध्येला पुन्हा

मुंबई-ठाण्यातून दीड हजार शिवसैनिक विशेष रेल्वेने रवाना

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणूक आयोगाने 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे अधिकृत पक्षचिन्ह दिल्यानंतर मंत्री, आमदार आणि सहकाऱ्यांना घेऊन अयोध्या दौऱ्यावर जाणार असल्याची घोषणा केली होती. त्यामुळे या दौऱ्याबद्दल शिवसैनिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. पाच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री शिंदे यांनी ९ एप्रिल ही अयोध्यादौऱ्याची तारीख घोषित केली. त्यानंतर अल्पावधीतच तयारी करून शुक्रवारी दीड हजार शिवसैनिकांची विशेष रेल्वे गाडी अयोध्येच्या दिशेने रवाना झाली. मुख्यमंत्री शिंदे आणि डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या गाडीला ठाणे स्थानकात भगवा झेंडा दाखवला.

'अयोध्या मे शंखनाद, आर रहे है एकनाथ', असे म्हणत शिवसेनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अयोध्यादौऱ्याची जोरदार तयारी सुरू केली असून, त्याअंतर्गत दीड हजार शिवसैनिकांची पहिली कुमक शुक्रवारी ठाण्यातून रवाना झाली. या दौऱ्याची घोषणा झाल्यानंतर मागील पाच दिवसांपासून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, दिवा, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ आणि बदलापूरपासून ते पालघरपर्यंत पदाधिकाऱ्यांना तयारीच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार पहिली रेल्वेगाडी ठाणे स्थानकातून सोडण्यात आली. यावेळी कल्याण डोंबिवलीचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार रवींद्र फाटक, नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते विजय चौगुले, ठाणे जिल्हा महिला संघटिका मीनाक्षी शिंदे, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्यासह शिवसेनेचे ठाणे जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या गाडीतून शिवसेनेने अयोध्येसाठी शिवसैनिकांची ठाण्यातून कुमक धाडल्याची चर्चा यानिमित्त सुरू झाली आहे.

'चिन्ह मिळाल्याने अयोध्येत'

'प्रभू श्रीरामाच्या आशीर्वादाने आम्हाला धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह मिळाले असून, त्याबद्दल श्रीरामाचे आशीर्वाद घेण्यासाठी आम्ही सर्वजण अयोध्येला जात आहोत. अयोध्या हा आमच्यासाठी श्रद्धेचा विषय आहे. तिथे भव्य राममंदिर उभारले जावे, ही स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची इच्छा होती. हे स्वप्न आज पूर्ण होत असून, या मंदिराचे निर्माणकार्य आम्हाला 'याची देही याची डोळा' पाहता येणार आहे', असे या विशेष गाडीला भगवा झेंडा दाखवून अयोध्येकडे रवाना केल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना नमूद केले. तसेच, मंत्रिमंडळातील सहकारी मंत्री, आमदार, खासदार आणि शिवसैनिकांच्या सोबत रामलल्लाचे दर्शन घेणार असल्याचेही ते म्हणाले.

'हिंमत असेल तर ठाण्यातून लढा!'

शीतल म्हात्रे यांचे आदित्य यांना आव्हान

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

'हिंमत असेल तर तुम्ही ठाण्यातून उभे राहाच. ठाणेकर तुमचे डिपॉझिट जप्त केल्याशिवाय राहणार नाहीत', अशा शब्दांत शिवसेनेच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी शुक्रवारी माजी मंत्री आदित्य ठाकरे यांना डिवचले.

आदित्य यांनी ठाण्यातील 'जनआक्रोश मोर्चा'त ठाण्यातून लढण्याचे संकेत दिले होते. या पार्श्वभूमीवर म्हात्रे यांनी फेसबुकवर व्हिडीओ शेअर करीत त्यांना आव्हान दिले आहे. 'धर्मवीर आनंद दिघेजी यांच्या ठाण्यात आदित्य ठाकरे यांनी सहल नेली होती. यावेळी आदित्य यांनी अनेक वल्गना केल्या. भाषणे दिली. ते वरळी 'ए प्लस' करणार होते. याच वरळीत आता जनाधार मिळणार नाही, हे त्यांना कळून चुकले आहे. तीन-तीन आमदारांचा बळी घेतलेल्या वरळीतून आपण निवडून येणार नाही हे लक्षात आल्यामुळे मो ठाण्याला उभे राहणार असल्याचे ते म्हणाले. ठाण्यातील जनता सुज्ञ आहे. तुम्हाला तुमची जागा दाखवल्याशिवाय ठाणेकर राहणार नाही', असा टोला म्हात्रे यांनी लगावला आहे.

'ठाणेकर डिपॉझिट जप्त करतील'

'तुम्ही ठाण्यावर दावा सांगितल्याने ठाण्यातल्या आजीमाजी आमदार आणि नवस्थानगवस्था इच्छुकांना आपला बळी तर जाणार नाही ना, अशी भीती वाटत आहे. आता जे बोलतो ते करतो हे दाखवून द्या. कारण जे बोलतो ते करत नाही, अशी तुम्हा पिता-पुत्रांची ख्याती आहे', असेही म्हात्रे यांनी म्हटले आहे.

'उद्धव म्हणाले तर एकत्र येता येईल!'

मुंबई : माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'फडतूस' म्हटल्यानंतर भाजप नेत्यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली. अशातच उद्धव यांनी पुन्हा भाजपसोबत येण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सूचक वक्तव्य केले आहे. 'उद्धव ठाकरे 'रात गई, बात गई' असे म्हणाले, तर एकत्र येता येईल', असे त्यांनी म्हटले आहे.

'देवेंद्र फडणवीस यांचे मन किती मोठे आहे हे मला माहिती आहे. मात्र, काहीही बोलाल तर ते सहन करणार नाहीत. उद्धव यांनी एकदाही 'घरी या, बोलू' असे म्हटलेले नाही. फडणवीस असे दरवाजे बंद करणारे नाहीत', असे पाटील एक वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले.

संवाद

रविवार, ९ एप्रिल २०२३

कोलंबसचे मृत्युगीत!

अमेरिकेत राहण्याच्या आकर्षणापोटी कॅनडाहून निघालेले चौघांचे कुटुंब बोट उलटल्याने बुडाले आणि मरण पावले. ही एकमेव घटना नाही. अमेरिकेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी असे अनेक जण जीवावरचा प्रवास करीत असतात. त्यासाठी 'अनंत अन् आशा' तेवतात. फक्त हे त्यांच्यासाठी 'मर्गगीत' नव्हे, तर 'मृत्युगीत' ठरते. का होत असेल असे?

– डॉ. नंदू मुलमुले

कर्नाटकाचा वेगळा बाज

अन्य दाक्षिणात्य राज्यांच्या तुलनेत कर्नाटकाचा बाज वेगळा आहे. ते लक्षात घेऊनच तेथील राजकीय घडामोडींकडे, विशेषत: निवडणुकांकडे पाहावे लागते. दाक्षिणात्य राज्यांच्या चौकटीत कर्नाटकला बसवून अनुमान काढल्यास ते चुकू शकतात.

– श्रीधर लोणी

दरवाढ आणि स्वस्त विजेचा शोध

महागडी वीज ग्राहकांच्या माथी न मारता स्वस्त पर्याय शोधा, असे निर्देश महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरण कंपनीला नुकतेच दिले. हे करणे शक्य आहे का, स्वस्त विजेसाठीचे पर्याय कोणते याविषयी...

– शंतनू दीक्षित

वाशिंबा, इटलीची भाषिक ढाल (सुनीला गोंधळेकर), व्याघ्र प्रकल्पाची ५० वर्षे (केदार गोरे) आणि सोबत, 'माझी मुंबई', 'या वळणावर', 'नवदीच्या आगे मागे', 'कथाख्यान' आणि 'दीडदमडी' ही लोकप्रिय सदरेही वाचा, रविवारच्या 'संवाद' पुरवणीत...

आशीष देशमुख यांच्यावर कारवाई होणार?

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

शिस्तपालन समितीने दिलेली मुदत संपली

काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासह पक्षश्रेष्ठींवर वारंवार टीका केल्याप्रकरणी काँग्रेसच्या शिस्तपालन समितीने काँग्रेसचे नेते आशीष देशमुख यांचे निलंबन केले आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी होईपर्यंत ही कारवाई करण्यात आली असून, त्यांना याप्रकरणी खुलासा करण्यासाठी तीन दिवसांची मुदत देण्यात आली होती. तो शुक्रवारी संपली. त्यामुळे शिस्तपालन समिती आता काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आशीष देशमुख यांनी मागील काही दिवसांपासून राहुल गांधी यांच्यावर टीका केली होती. त्याशिवाय राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनाही लक्ष्य केले होते. त्यामुळे त्यांच्याविरोधात कारवाई करण्यासाठी काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मुंबईत शिस्तपालन समितीची बैठक पार पडली होती. यात देशमुख यांना कारणे दाखवा नोटीस पाठवून उत्तर देण्यासाठी तीन दिवसांची मुदत देण्यात आली होती. या नोटिशीमध्ये देशमुख यांच्यावरील आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याचे नमूद करण्यात आले असून, उत्तर न दिल्यास तुम्हाला आरोप मान्य आहेत असे समजण्यात येईल, असेही अधोरेखित करण्यात आले होते.

दरम्यान, देशमुख यांनी शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत या नोटिशीला उत्तर दिले नसल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे आता याप्रकरणी शिस्तपालन समिती आणि देशमुख काय भूमिका घेतात, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

दोन न्यायालयांचे बेलापुरात उद्घाटन

नवी मुंबई : 'राज्यभरातील इतर न्यायालयांमध्ये पेपरलेस कारभार आणि डिजिटल न्यायालयाला विरोध होत असताना, बेलापूर न्यायालय राज्यातलेच नव्हे, तर देशातील पहिले डिजिटल न्यायालय ठरले आहे', असे गौरवोद्गार मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. गौतम पटेल यांनी शुक्रवारी काढले. तसेच, वकील संघटनेने केलेल्या कामाचेही त्यांनी कौतुक केले.

न्या. गौतम पटेल आणि न्या. गौरी गोडसे यांच्या उपस्थितीत आणि ठाणे जिल्ह्याचे सत्र न्यायाधीश अभय मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी अतिरिक्त सत्र न्यायालयाचे उद्घाटन [illegible]

वकिलांच्या संरक्षणासाठी

'रोशनी शिंदेंना म्हाडाण

विवाहविषयक
वर पाहिजे
सर्वसाधारण
जातीचे बंधन नाही
वधू वय 29,उंची 5.3,शिक्षण 11 वी, घासुली शिवणकाम करते. आई वडील नाही. मावशीकडे राहते. जात मराठा, त्वरित विवाह. 9168225941
वैयक्तिक
नावबदल
I, Asha Rajaram Kadam, D/O of Rajaram Mukund Kadam R/O Room 4, Tulshikashi Rahivashi Chawl, Near Joshi Villa Building, Sector 20, Airoli, NaviMumbai, Maharashtra-400701 have changed my name to Nikita Nitesh More for all purposes for all future purposes
I, Poonam Anil Shastri D/o Dinesh Kumar Kanojia R/o L/302 Mgm Park Cha Ltd, Mgm Nagar, Agashi Road, Bolinj, Virar West-401303 have changed my name to Poonam Dinesh Kanojia for all purposes
सर्विसेस
कुरिअर सेवा
अमेरिका,लंडन,युरोप,दुबई-कॅनडा पार्सल पाठवा / औषध पाठवा, सर्वात स्वस्त आणि लवकर पोहोचविणारे - मीनाक्षी पंडित: 8879991806
दुरुस्ती/वॉटरप्रुफिंग
100% लिकेज बंद, टेरेस, वॉटरप्रूफिंग,बिल्डिंग रिपेअरिंग कॉलम, बीम/RCC पॉलिमर ट्रीटमेंट फ्लास्टरिंग, पेंटिंग, वाजवी दरात. संपर्क - 9602281080 / 7977868080
जाहिरात एजन्सी
Time Advertising Helpline 022 24466191
जीवनसाथी नोंदीसेवा प्रॉपर्टी जन्मदिन शुभेच्छा लग्नवाढदिवस Times और सब पेपर में Wapp/ फोन करो हो जाएगे है. 24466556/ 8976181891
ज्योतिषशास्त्र
स्वामीसमर्थ तात्काळीच समाधान गृहक्लेश , व्यापार, कर्जमुक्ती,प्रेमलग्न, लग्नअडचन करणीबाधा, सौतन्दु:ख, लव प्रॉब्लेम स्पे. ठाणे 9022287287
स्वामी समर्थ मार्गदर्शक अनुभवी, जटिल समस्या, ग्रहकलह, लव प्रॉब्लेम, लग्न, तात्काळ मदत काही तासात खात्रीने सिद्धत्व. 7219004517 गुरुजी
महारुद्र ज्योतिष
9321386933
जीवनाचे सर्वसमस्यांचे समाधान, कामाची गांठी, लग्न विजनेस लव्हप्रॉब्लेम घटस्फोट संतान समस्याका मुठभोट वशीकरण तंत्रमंत्र, मौलाना

टेंडर्स आणि नोटिसेस

सार्वजनिक नोटीस

THE B. D. PETIT PARSEE GENERAL HOSPITAL
Bomanji Petit Road, Mumbai-400 036.
PUBLIC NOTICE
Medical records of patients other than medico-lecal cases, admitted in our hospital during the year 2013 will be destroyed in April 2023. Any one desirous of obtaining copies of his/her medical records for the period from 1st January, 2017 to 31st December, 2017, should submit a written request with details of admission / discharge records to the Medical Superintendent on or before 17th April 2023 without fail.

जाहीर नोटीस

[illegible]

PUBLIC NOTICE
Notice is hereby given to public at large that we Bhagat Family comprising of Mr. Kishore Dayalal Bhagat, Mrs. Usha Jitendra Bhagat, Mrs. Pratima Vijay Bhagat, Mrs. Sudha Ramesh Bhagat and 13 other family members, owners of Land being Plot Nos. 212 of Survey No. 89 Hissa No. 9 corresponding to C. T. S. Nos. 310, 310/1 to 9 of Village Poinsar, Taluka Borivali, Mumbai Suburban District, admeasuring about 781.65 Sq. Mtrs. along with the building known as 'BHAGAT NIWAS' under our advocates notice dated 25th March 2023 have cancelled/ terminated the Development Agreement dated 20th September 2021 and duly registered under Sr.No. BRL6/13639/2021 and the Power of Attorney dated 20th September 2021 and duly registered under Sr. No. BRL6/13691/2021 at the office of sub-registrar of assurance Borivali in favour of VENCON REALTY AND INFRASTRUCTURE LLP having address at A-401 Pranay Vidya CHSL, New Sabade Nagar Ext., Opp. Pawar Public School, Kandivali (West), Mumbai 400067, the partners of said LLP Being Mr. Vishal Arora and Mr. Ansari Abdul Rahman. We were compelled to cancel and terminate the Development Agreement and Power of Attorney both dated 20th September 2021 for non-compliance / violation of terms and conditions of the said Agreement. We further inform the public at large to not to deal in any arrangement with the said VENCON REALTY AND INFRASTRUCTURE LLP and its partners with respect of the said Property and the same shall not be binding on us. We further inform to the public at large that we shall be at liberty and may proceed to deal with the said Property in our own discretion.
Schedule of Property
Plot Nos. 212 of Survey No. 89 Hissa No. 9 corresponding to C. T. S. Nos. 310, 310 / 1 to 9 of Village Poinsar, Taluka Borivali, Mumbai Suburban District, admeasuring about 781.65 Sq. Mtrs. along with the building known as "BHAGAT NIWAS"
Kishore Bhagat,
Usha Bhagat & Family

टेंडर्स

Project Management Consultant for Home CHS Redevelopment
Bids are invited within 2 weeks from apt Project Management Consulting (PMC) firms enlisted with MCGM or other competent authorities, for providing PMC services to indicate Feasibility for Redevelopment of HOME CHSL, Relief Road, Santacruz (West), Mumbai – 400054. Email: homesociety1965@gmail.com for procuring detailed Scope of Work or Call 9867301355 / 9967657559

S. N. D. T. WOMEN'S UNIVERSITY
Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University
1, Nathibai Thackersey Road, Churchgate, Mumbai 400 020
TENDER NOTICE
Expressions of Interest (EOI) are invited from Chartered Accountant firms empanelled with the Comptroller & Auditor General of India separately for the following i) Professional Consultancy Services for Taxation and Allied matters for FY 2023-24 to 2025-26 at all campuses Churchgate, Juhu & Pune on or before 22nd April, 2023, 15:00 hours (IST) For details refer to our website: www.sndt.ac.in

TO BOOK AN ADVERTISEMENT IN THIS SECTION CALL:
KUNAL SAMTANI 9322348803
VIJAY KURSIJA 9819464634
ABHIJEET MISHRA 7710888884

TENDER NOTICE FOR REDEVELOPMENT
Sealed tenders in prescribed format are invited from reputed and financially sound developers & builders for Cluster Redevelopment Scheme of Kumari Jethi T Sipahimalani CHS Ltd. (Navjivan Society, Mahim) on plot bearing F.P. No. 985, TPS-III, Mahim, admeasuring 14,600.45 sq. mtrs. situated at the junction of VMC Road No. 2 & Mori Road, Mahim, Mumbai-400 016. The developers/builders interested in the cluster redevelopment can collect blank tender documents from the society's office at above address on payment of tender cost of Rs. 2,00,000/- (Rupees Two Lakhs Only) by pay order favoring 'Kumari Jethi T Sipahimalani CHS Ltd' from 10/04/2023 to 25/04/2023 (both days inclusive) between 10.00 a.m. to 5.00 p.m. from Monday to Saturday and duly filled tender document shall be submitted in the Society's office latest before 5.00 p.m. on 25/05/2023. The tender cost is non-refundable & non-transferable. Those who are interested in knowing further details can inspect the tender document and site with prior appointment of the Manager of the society. Mr. Vinod Adsule on +91 88805 65623. Society Office, 16B, Ground floor, Kumari Jethi T Sipahimalani CHS., Mori Road, Mahim, Mumbai 400 016. The Society reserves the right to accept / reject any or all Tenders without assigning any reason thereof.

TIMES TRIBUTE
PAYING HOMAGE TO THE DEPARTED SOUL
Call: 18001205474 (Toll Free)

स्मरणार्थ

द्वितीय पुण्यस्मरण
कै.श्री. सुभाष पु. सावंत
दिनांक : ०८.०४.२०२३
पवित्र तुमची स्मृती || अनंत तुमची माया || नित्य असुदा आमच्या वरती || अखंड तुमची छाया ||
भावपूर्ण श्रद्धांजली
श्रीम. सुधमा सुभाष सावंत
श्री. सिद्धेश सुभाष सावंत
श्रीम. सिद्धी सिद्धेश सावंत
कु. विहान सिद्धेश सावंत

पुण्यतिथी

अकरावा स्मृती दिन
कै. मधुकर पुंडलिक कनेगुडकर
पुण्य तिथि: ८ एप्रिल २०१२
कामच्या सर्व शुभचिंतकांचा प्रतीची व्यासुदा तुमची आठवण, तुमचे विचार आणि शिकवण प्रेरणादायी ठरते.
तुमच्या स्मृतीस वंदन कनेगुडकर परिवारा कडून भावपुर्ण आदरांजली.
मोबाईल: ९९६०१४७२७२

REMEMBRANCE
SHARING MEMORIES

चौदावा स्मृतिदिन
कै. श्रीमती अनिता अनंत कुंभार
"आठवण तुझी नित्य हृदयी जागते आहे."
चौदाव्या स्मृतिदिना निमित्त भावपूर्ण श्रद्धांजली
पति: अनंत गंगाराम कुंभार
मुली: रेश्मा व अमृता यांजकडून